जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि ५८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 22 MAY 1996

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- प्रथम मान्यता. श्री विठ्ठल माध्य. विद्या. कांबळेश्वर ता. बारामती

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ब-४/९५-९६ दि. २८/१२/९५

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३, अन्वये श्री विठ्ठल विद्या. प्रसारक मंडळ शिर्कोबानगर ता. बारामती संस्थेच्या श्री विठ्ठल माध्य. विद्या. कांबळेश्वर ता. बारामती माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /९वी /१०वी च्या वर्गास सन १९९४ - १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१० ] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ] विद्यार्थी संख्या वाढवावी.
१४ ]
१५ ]

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, श्री विठ्ठल माध्य. विद्यालय कांबळेश्वर ता. बारामती.